पुढारी | MY कोल्हापूर | मंगळवार, ११ जून २०२४

# शैक्षणिक विचारांवर राष्ट्राचे भवितव्य अवलंबून

## दत्तात्रय वारे यांचे प्रतिपादन; डॉ. बापूजी साळुंखे जयंती कार्यक्रम

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

राष्ट्राचे भविष्य हे शैक्षणिक विचारावर अवलंबून असते. आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक विचारांची प्रक्रिया शिक्षणातून उभी राहते. प्रत्येक कर्तृत्ववान व्यक्तीमागे एक शिक्षक असतो. त्यामुळे शिक्षकांनी आपली कर्तव्ये जपली पाहिजेत, असे प्रतिपादन अटलबिहारी वाजपेयी आंतरराष्ट्रीय शाळा वाबळेवाडीचे जनक मुख्याध्यापक दत्तात्रय वारे गुरुजी यांनी केले.



**कोल्हापूर : शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या जयंती कार्यक्रमात बोलताना मुख्याध्यापक दत्तात्रय वारे. सोबत प्राचार्य अभयकुमार साळुंखे, प्राचार्या शुभांगी गावडे, प्राचार्य डॉ. आर. व्ही. शेजवळ.**

शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या १०६ व्या जयंतीप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून 'नवीन शैक्षणिक धोरण आणि शिक्षकांची भूमिका' या विषयावर ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे होते. दत्तात्रय वारे गुरुजी म्हणाले, नवीन शैक्षणिक धोरणाची योग्य अंमलबजावणी केल्यास कौशल्याधारित विद्यार्थी घडविता येतो. शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या विचारांचा वारसा मोठा आहे. महाराष्ट्राला वैचारिक वळण देण्याचे काम डॉ. बापूजी साळुंखे आणि स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेने केले आहे. बापूजींचा विचार शिक्षकांनी अध्यापनात उतरवणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल. अध्यक्षीय भाषणात संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे म्हणाले, शिक्षणातील संधी आणि आव्हाने ओळखून बापूजींनी कार्य केले. या शिक्षणयज्ञात बापूजींनी अव्याहतपणे कार्य केले. विद्यार्थ्याला घडविणे हे प्रत्येक शिक्षकाचे उद्दिष्ट्य असायला हवे. यावेळी संस्था उपाध्यक्ष नामदेवराव कांबळे, सचिव प्राचार्या शुभांगी गावडे, प्राचार्य डॉ. आर. व्ही. शेजवळ, एस. एम. गवळी, संस्थेचे सीईओ कौस्तुभ गावडे, श्रीराम साळुंखे, प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे, प्राचार्य डॉ. जयसिंगराव देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती.

तरुण भारत संवाद
मंगळवार, ११ जून २०२४

# शिक्षणमहर्षी डॉ.साळुंखेंच्या जयंतीदिनी वृक्षारोपण

**कोल्हापूर :** येथील स्वामी विवेकांनद शिक्षण संस्थेचे संस्थापक, शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या १०६ व्या जयंती निमित शेंडा पार्क येथील ऑक्सिजन पार्कमध्ये वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी राजेंद्र साळुंखे, डॉ. लक्ष्मीकांत नलवडे, अर्चना कुलकर्णी, रमेश पाटील, उमेश मगदुम, प्रतिक साळुंखे, श्रवण पोवाळकर, विनोद पाटील, हर्षवर्धन शिंदे, अथर्व टकले, करण यादव आदी उपस्थित होते.